| MHSN060003522024 | R.C.S. 43/2024<br>Shankar Babu Ingole Ingvale Thr Legal Heir<br>Vs. Sarjerao Mukinda Bisure |
|---|---|

## नियमित दिवाणी दावा नं. ४३/२०२४

## मिरज येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मिरज यांचे न्यायालयात

१. शंकर बाबू इंगवले (इंगोले) मयत तर्फे वारस व इतर ... वादी

विरुध्द

१. सर्जेराव मुकुंदा बिसुरे व इतर ... प्रतिवादी

## निशाणी ५ व २५ खालील परिणामकारक संयुक्त आदेश

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा निशाणी ५ व निशाणी २५ खालील अर्ज मंजूर करणेत येतात. |
| २. | यातील प्रतिवादी क्रमांक १ ते ७ यांनी स्वतः अगर तर्फे इसमांच्या मार्फत दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, मिरज यांचेकडील रस्ता केस/१४३/एस.आर./१६/२०२२ मधील दिनांक ११.०९.२०२२ रोजी झालेल्या निकालाची अंमलबजावणी करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देणेत येते. |
| ३. | त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. १ ते ७ यांनी स्वतः अगर तर्फे इसमांच्या मार्फत वादींच्या खटाव येथील गट नं. २३६, जानराववाडी येथील गट नं. १५६, १५७, १५८ च्या सरबांधावरुन सदर दाव्याच्या अंतीम निकालापर्यंत रस्ता निर्माण करु नये आणि दावा मिळकतीमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा कोणत्याही प्रकारे करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देणेत येते. |
| ४. | त्याचप्रमाणे मंडळ अधिकारी, आरग यांचेकडील क्र.र.नं. ५०६/२०२५ प्रमाणे तहसिलदार, मिरज यांचेकडील रस्ता केस/१४३/एस.आर./१६/२०२२ मधील दिनांक ११.०९.२०२२ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी व त्याप्रमाणे प्रस्तावित कार्यवाही दाव्याच्या अंतीम निर्णयापर्यंत तहकूब ठेवणेत यावी. |
| ५. | सदरच्या आदेशाची तहसिलदार, मिरज तसेच मंडळ अधिकारी, आरग यांना प्रत पाठविण्यात यावी. |
| ६. | सदरच्या अर्जाचा खर्च मूळ दाव्यासोबत चालविण्यात यावा. |

ANIRUDHA SUNIL RANE

Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.08.14 18:00:45 +0530

मिरज
दि.१४.०८.२०२५

**(ए. एस. राणे)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.